विशेष दरखास्त क्र.०८/२०२०
किशनराव वि. शासन

**नि.क्र.१७ खालील आदेश**

**०१.** अर्जदार क्र.१/६ भारत किशनराव जाधव याने अर्ज दिला की, दि.०६/०४/२०२२ रोजी नि.क्र.१० वर नुकसान भरपाई रुपये ३,४०,५२९/- व्याजासह उचलण्याचा आदेश अर्जदार क्र.१/१ ते १/५ यांच्या हक्कात पारीत झाला आहे. परंतु, अर्जदार क्र.१/२ याची त्यास संमती नाही. म्हणून, त्याचा वेगळा हिस्सा होणे गरजेचे आहे. अर्जदार क्र.१/१, १/३ ते १/५ हे सख्खे बहिण-भाऊ असून अर्जदार क्र.१/१ ही त्यांची आई आहे. सदर त्यांच्या हिश्शांची रक्कम अर्जदार क्र.१/१, १/३, १/४ व १/५ यांच्या वतीने अर्जदार क्र.१/६ याच्याकडे देण्यास त्यांची संमती आहे. त्यामुळे, या पाच अर्जदारांची रक्कम अर्जदार क्र.१/६ याला मिळावी अशी विनंती करण्यात आली.

**०२.** अर्जदार क्र.१/२ याच्या वतीने म्हणणे देण्यात आले की, तो संपर्कात नसल्याने त्याची हिश्शांची रक्कम बाकी ठेवून उर्वरीत रक्कम बाकी अर्जदारांना द्यावी.

**०३.** नि.क्र.१२ लगत संमतीपत्र दाखल असून अर्जदार क्र.१/१, १/३ ते १/५ यांनी त्यांच्या हिश्शांची मावेजाची रक्कम अर्जदार क्र.१/६ याला देण्यात यावी असे नमूद केले आहे.

**०४.** अर्जदार क्र.१/२ हा संपर्कात नाही असे त्यांच्या वकिलाचे कथन आहे. दरम्यानच्या काळात अर्जदार क्र.१/१ ही मयत झाल्याचे नि.क्र.२१/१ या मृत्यु प्रमाणपत्रावरुन दिसते. मृत्यु प्रमाणपत्र बायनाबाई किशनराव जाधव यांचे आहे. बायनाबाई आणि राधाबाई या एकच व्यक्ती आहेत अशा आशयाचे शपथपत्र राजेश किशनराव जाधव अर्जदार क्र.१/५ यांनी नि.क्र.२४ लगत दिलेले आहे.

**०५.** न्यायालयात जमा असलेली रक्कम व त्यावरील व्याज याचे राधाबाई मयत होण्यापुर्वी सहा हिस्से होत होते. राधाबाई मयत झाल्याने तिच्या हिश्शांची रक्कम तिच्या वारसांमध्ये (तिने जर मृत्युपत्र करुन या रक्कमेची विल्हेवाट कशी लावावी हे नमूद केले नसेल तर) समान हिश्शांने वाटली जाईल. अर्जदार क्र.१/२ ते १/६ हे वर्ग-१ चे वारस आहेत. त्यामुळे, मयत राधाबाई यांच्या हिश्शांच्या रक्कमेची विभागणी अर्जदार क्र.१/२ ते १/६ यांच्यामध्ये करण्यापुर्वी त्यांचे

कोणतेही मृत्युपत्र अस्तीत्वात नाही याची खातरजमा अर्जदारांनी करुन द्यावी. त्यानंतर, त्या अनुषंगाने न्यायालयात जमा असलेली रक्कम वाटप करण्याबाबत आदेश करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

दिनांक:३०/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर